# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर.

## (शिक्षण विभाग)

क्र. /3375/शि.वि./2014 दि./12/11/2014

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ. / उच्च प्राथ. / माध्य. शाळा,
महानगरपालिका, नागपूर.

**विषय :— 14 नोव्हेंबर (बालक दिन) ते 19 नोव्हेंबर (जागतिक शौचालय दिन) यामध्ये नागपूर जिल्हयात स्वच्छ भारत मिशन राबविणे.**

**संदर्भ :— मा. जिल्हाधिकारी, नगापूर यांचे पत्र क्र. सामान्य / कक्ष—9 / कावि428 / 2014 दि. 07.11.2014**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मा. पंतप्रधान यांनी 2 ऑक्टोंबर 2014 रोजी स्वच्छ भारत मिशन घोषित केले आहे. स्वच्छ भारत मिशनमध्ये सार्वजनिक आस्थापनांच्या ठिकाणी सार्वजनिक स्थळांच्या ठिकाणी, घर व गावातील परिसर स्वच्छता, वैयक्तिक व सार्वजनिक शौचालयाची बांधणी, अंगणवाडी व शालेय स्वच्छतागृहांची बांधणी तसेच उघडयावरील शौचाची प्रथा बंद करणे या बाबी महत्वपूर्ण आहेत.

दि. 14 नोव्हेंबर (बालक दिन) ते 19 नोव्हेंबर (जागतिक शौचालय दिन) यामध्ये नागपूर जिल्हयात स्वच्छ भारत मिशन राबविण्यासाठी संदर्भिय पत्राव्दारे मा. जिल्हाधिकारी यांनी कळविले आहे. उपरोक्त कालावधीत आपला शालेय परिसर स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची ठिकाणे स्वच्छ ठेवण्याबाबत कटाक्षाने काळजी घ्यावी. विद्यार्थ्यांना आपले घर, परिसर व सार्वजनिक ठिकाणे स्वच्छता पाळण्याबाबत तसेच उघडयावर घाण न करण्याबाबत सूचना दयाव्यात. पिण्याच्या पाण्याची व स्वच्छतागृहाची व्यवस्था नसल्यास किंवा काही अडचणी असल्यास झोन विभागाशी संपर्क साधून त्या दूर कराव्यात. व कार्यक्रमाचा अहवाल कार्यालयास सादर करावा.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर

PC:2/D:\reshma:/Tembhurne sir \ Letter 1.doc